# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७
चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि / 2048/2022 दिनांक: 16/03/2022

अत्यंत महत्वाचे/

## परिपत्रक

विषय :—महाविद्यालयांतील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत (कॅस) प्रलंबित प्रकरणाबाबत

संदर्भ :— मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक युएनआय/२०२२/परिपत्रक/कॅस /विशि—१/११८३ दिनांक ८/०२/२०२२ प्राप्त दिनांक २२/०२/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडुन उपरोक्त संदर्भान्वये विद्यापीठाला पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रानुसार संलग्नित महाविद्यालयांतील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबत महाविद्यालयांकडुन तात्काळ कार्यवाही घेण्याबाबतचे आदेश प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांचे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतच्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही घेऊन सदर प्रस्ताव विद्यापीठात सादर करावा. जेणेकरुन विद्यापीठाकडुन नियमानुसार समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही घेणे सोईचे होईल. जे महाविद्यालय अध्यापकांच्या प्रलंबित करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करणार नाही अशा महाविद्यालयांवर/संस्थेवर विद्यापीठाकडुन तसेच शासनाकडुन कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी.

सहपत्र:— मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र

मा. कुलसचिव यांच्या आदेशानुसार

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:—

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र—कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.**
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक- युएनआय/२०२२/परिपत्रक/कॅस/विशि-१ / ११८३ दिनांक- - 8 FEB 2022
**परिपत्रक-**

**वाचा: १.शासन परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१९/प्रक्र.२२८/१९/विशि-१ दिनांक ०८ जुलै, २०१९**

**विषय- अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत (कॅस) प्रलंबित प्रकरणाबाबत.**

राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत (कॅस) पदोन्नतीची प्रकरणे दीर्घकाळ विद्यापीठे व महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. अशा स्वरुपाच्या तक्रारी राज्य स्तरावर विविध शिक्षक संघटनांकडून प्राप्त होत आहेत. शासन शुध्दीपत्रक दिनांक १० मे,२०१९ मधील पदोन्नतीच्या दिनांकाबाबतच्या तरतूदी विचारात घेता अध्यापकांची CAS प्रकरणे वेळेवर निकाली काढणे आवश्यक आहे.

अध्यापकांना सेवातंर्गत प्रगती योजना (कॅस) च्या अर्हता व पात्रता पुर्ण केल्यानंतर छाननी/पदोन्नतीची प्रक्रिया पुर्ण करुन शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे पदोन्नती देणे आवश्यक आहे. याबाबत शासन परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१९/प्रक्र.२२८/१९/विशि-१ दिनांक ०८ जुलै, २०१९ अन्वये स्वयंस्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या तरतूदी विचारात घेऊन विद्यापीठ स्तरीय तसेच संस्था व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे स्तरावर प्रलंबित असलेल्या सेवांतर्गत प्रगती योजनेची प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावीत.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
 २. त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक हे आपल्या अधिनस्थ सर्व विद्यापीठे व महाविद्यालयाना आपल्या स्तरावरुन अवगत करण्यात यावे.